

MAHARASHTRA STATE BOARD OF TECHNICAL EDUCATION MUMBAI

Bridge To The Future











# दहावी नंतर उज्ज्वल | भविष्याचा राजमार्ग

## ३ वर्षाचा अभियांत्रिकी पदविका (Diploma) - एक उत्कृष्ट पर्याय

## महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

(Autonomous) (ISO 9001:2015) (ISO/IEC 27001:2013)




## मंडळाचे ध्येय व उद्देश

उद्योगधंद्यांच्या गरजेप्रमाणे अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम राबवून विद्यार्थ्यांना रोजगारक्षम करणे

### मंडळाची प्रमुख कार्ये

- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त पदविका अभ्यासक्रम संलग्नित संस्थामार्फत राबविणे.
- महाराष्ट्र राज्य शासनाचे कौशल्याभिमुख पदविका व इतर अभ्यासक्रम संलग्नित संस्थां / कौशल्य विकास केंद्रामार्फत राबविणे.
- पाठ्यक्रम विकास व अद्ययावत करणे.
- पदविका अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेणे व निकाल जाहीर करणे.

### मंडळाशी संलग्नित प्रमुख अभ्यासक्रम :

- स्थापत्य अभियांत्रिकी (Civil Engg.)
- यंत्र अभियांत्रिकी (Mechanical Engg.)
- विद्युत अभियांत्रिकी (Electrical Engg.)
- अणुविद्युत अभियांत्रिकी (Electronics Engg.)
- संगणक अभियांत्रिकी (Computer Engg.)
- इतर अभियांत्रिकी (Chemical, Printing, Textile Engg.)

## १० वी नंतर अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमच का ?

- स्वयंरोजगार व नोकरीच्या संधी हमखास उपलब्ध करून देणारा, एकमेव अभ्यासक्रम आहे.
- पदविका अभ्यासक्रमात प्रात्यक्षिक/कौशल्यावर भर असल्याने, पदविका उत्तीर्ण विद्यार्थ्यांना नोकरीसाठी उद्योगांकडून निवड करताना प्राधान्य दिले जाते.
- स्वतःचा व्यवसाय/उद्योगधंदा सुरू करता येतो.
- अभियांत्रिकी पदविका धारकांना अभियांत्रिकी पदवी प्रवेशाकरीता JEE/CET सारखी प्रवेश परिक्षा न देता गुणवत्तेनुसार थेट द्वितीय वर्ष पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश मिळतो.
- पदविका उत्तीर्ण विद्यार्थी परदेशी विद्यापीठातील पदवी अभ्यासक्रमाला सुध्दा प्रवेश पात्र आहे.







## पदविका प्राप्त विद्यार्थ्यांच्या क्षमता

### स्थापत्य अभियांत्रिकी (Civil Engg.)

- शासकीय, खाजगी संस्थांमध्ये कनिष्ठ अभियंता / कार्यक्षेत्र पर्यवेक्षक या पदावर काम करणे.
- केंद्रीय लोक निर्माण विभाग, रेल्वे, पाणी पुरवठा, सिंचन विभाग, सिडको, पी. डब्लु. डी., म्हाडा, महानगरपालिका इ. आस्थापनावर कंत्राटदार म्हणून काम करणे.

### यंत्र अभियांत्रिकी (Mechanical Engg.)

- पर्यवेक्षक, गुणवत्ता नियंत्रण कार्यदेशक, विकास पर्यवेक्षक इ. म्हणून काम करणे.
- यंत्र सामुग्री व उपकरणे यांची देखभाल करणे व ते अद्ययावत ठेवणे.

### विद्युत अभियांत्रिकी (Electrical Engg.)

- ऊर्जा संबंधित क्षेत्रातील विविध उद्योग, शासकीय व खाजगी संस्थांमध्ये, कनिष्ठ / देखभाल अभियंता, पर्यवेक्षक / कार्यक्षेत्र पर्यवेक्षक व विद्युत कंत्राटदार, मुल्यांकन पर्यवेक्षक इ. पदांवर कामे करणे.
- विद्युत उपकरणे व यंत्र सामुग्रीची देखभाली संदर्भात लघु उद्योग स्थापित करणे.

### अणुविद्युत अभियांत्रिकी (Electronics Engg.)

- तंत्रज्ञ / कार्यक्षेत्र पर्यवेक्षक / डिझाईन अभियंता म्हणून काम करणे, अणुविद्युत संबंधी उद्योगांमध्ये, दूरसंचार व भ्रमणध्वनी क्षेत्रात काम करणे.
- अणुविद्युत उपकरणाची दुरूस्ती, विक्री व देखभालीच्या कामांसाठी व अपारंपारिक ऊर्जा निर्माण क्षेत्रामध्ये लघु उद्योग स्थापित करणे.

### संगणक अभियांत्रिकी (Computer Engg.)

- हार्डवेअर / नेटवर्क / क्षेत्रिय अभियंता म्हणून माहिती तंत्रज्ञान / सॉफ्टवेअर / उद्योग क्षेत्रामध्ये व शासकीय विभागामध्ये काम करणे.
- संगणक व नेटवर्क प्रणाली याची रचना तयार करणे व स्थापित करणे, त्याची वेळोवेळी देखभाल करणे व वेळोवेळी समस्या निवारण करणे.

### इतर अभियांत्रिकी (Chemical, Printing, Textile Engg.)

- तेल, गॅस रिफायनरी, रेझिन्स, रबर, पॉलिमर, पॉलिस्टर, रंग व अन्न उद्योग इ. मध्ये प्रक्रिया ऑपरेटर / रासायनिक अभियंता / तंत्रज्ञ, कार्यक्षेत्र पर्यवेक्षक म्हणून काम करणे. तसेच वस्त्रशास्त्र कारखाना व कपडा उत्पादन उद्योगांमध्ये अभियंता / उत्पादन अभियंता / गुणवत्ता नियंत्रण अभियंता / प्लान्ट पर्यवेक्षक म्हणून काम करणे.

## विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासाकरीता मंडळामार्फत राबविण्यात येणारे उपक्रम



पेपर सादरीकरण स्पर्धा



प्रकल्प प्रदर्शन व स्पर्धा



प्रश्नमंजुषा स्पर्धा



औद्योगिक प्रशिक्षण (इंटर्नशिप)

अभ्यासक्रमाच्या माहितीसाठी www.msbte.org.in
आणि प्रवेश प्रक्रियेसाठी www.dtemaharashtra.gov.in ला भेट द्या

## सतत विचारले जाणारे प्रश्न (शंका निरसन)

### १. SSC परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील शिक्षणाकरीता कोणते पर्याय उपलब्ध आहेत ?

- तंत्रनिकेतनांमध्ये विविध अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाचे पर्याय.
- कनिष्ठ महाविद्यालयात ११ वी विज्ञान, कला, वाणिज्य शाखेत प्रवेशाचा पर्याय.
- ITI मधील विविध शाखेचे प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचा पर्याय. तसेच १२ वी Science / Vocational / Technical उत्तीर्ण केल्यानतंर अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या थेट द्वितीय वर्ष प्रवेशाचा पर्याय उपलब्ध आहे.

### २. पदविका अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया कशी आहे ?

- दहावी परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, तथा प्रवेश नियंत्रण अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे मार्फत सर्व मुख्य वर्तमान पत्रांमध्ये प्रवेश प्रक्रियेची सुचना प्रसिध्द करण्यात येते, ही सुचना www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर सुध्दा प्रसिध्द केली जाते.
- या सुचनेमध्ये राज्यातील शासकीय, अनुदानीत व विना अनुदानीत तंत्रनिकेतनांमधील प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर केले जाते.
- विद्यार्थ्यांना प्रवेशकरीता एकच Online अर्ज www.dtemaharashtra.gov.in या संकेत स्थळावर करणे आवश्यक असते.
- प्रवेश प्रक्रीयेसंदर्भात सविस्तर समुपदेशन व इतर सहाय्य सुविधा केंद्रामध्ये केले जाते.

### ३. पदविका अभ्यासक्रमाचे शुल्क किती आहे ?

- शासकीय व अनुदानीत तंत्रनिकेतनांचे शुल्क रु. ७,७५०/- इतके आहे.
- पदविका अभ्यासक्रमाचे विविध विनाअनुदानीत संस्थांचे शुल्क वेगवेगळे असून माहराष्ट्र शासनाच्या शुल्क नियंत्रण प्राधिकरणामार्फत संस्थेतील पदविका अभ्यासक्रमाचे शुल्क निश्चित केले जाते.
- संस्थेच्या संकेतस्थळावर शुल्काची माहिती उपलब्ध असते.

### ४. अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाचे शिक्षणाचे माध्यम कोणते आहे ? अभ्यासक्रम कोणत्या पध्दतीचा आहे ?

- अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या शिक्षणाचे माध्यम इंग्रजी आहे. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद मान्यताप्राप्त सर्व अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम हे सत्र (सेमीस्टर) पध्दतीचे आहेत. प्रत्येक सत्रांच्या अंति महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडून लेखी व तोंडी परीक्षा घेतल्या जातात.

### ५. अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम करण्याचे फायदे कोणते आहेत ?

- अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाचा मुख्य भर हा विद्यार्थ्यांमध्ये, उद्योगाला आवश्यक असलेले कौशल्य निर्माण करुन त्याला उद्योगासाठी उपयुक्त बनविणे हा आहे.
- अभियांत्रिकी पदविका उत्तीर्ण विद्यार्थी अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या थेट द्वितीय वर्ष प्रवेशास पात्र आहे.
- पदविका अभ्यासक्रमादरम्यान विद्यार्थ्याने पदवी अभ्यासक्रमातील विषयासंदर्भातील ज्ञान व कौशल्य बऱ्याच प्रमाणात आत्मसात केले असल्याने त्याला पदवी अभ्यासक्रम पुर्ण करणे सुलभ व सोपे होते.
- १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्याला अभियांत्रिकी पदवी प्राप्त करण्याकरीता पदविका मार्गाद्वारे ६ वर्षाचा कालावधी (३ वर्ष पदविका + ३ वर्ष पदवी) लागतो. तसेच तुलनेने १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्याला अभियांत्रिकी पदवी प्राप्त करण्याकरीता सुध्दा ६ वर्षाचा कालावधी लागतो (२ वर्ष HSC + ४ वर्ष पदवी)

### ६. पदविका अभ्यासक्रम शिकण्यासाठी आर्थिक सहायता / शिष्यवृत्ती उपलब्ध आहे का ?

- होय - विविध प्रकारच्या शिष्यवृत्त्या, शुल्क माफी योजना महाराष्ट्र शासनामार्फत जाहीर करण्यात येतात व www.mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे व त्याखालील प्रमाणे आहेत.
  - SC/ST/NT/DT विद्यार्थ्यांसाठी शुल्क माफी योजना.
  - आर्थिकदृष्ट्या मागास (EBC) विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना.
  - मंडळामार्फत गुणवंत व होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते.
  - OBC विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना.
  - अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना.

### ७. पदविका अभ्यासक्रमात अंतर्भूत बाबी

- पदविका अभ्यासक्रमात खालील बाबींची अंतर्भुत आहे.
  - ६ आठवडे कालावधीचे अनिवार्य औद्योगिक प्रशिक्षण.
  - प्रत्येक सत्रदरम्यान औद्योगिक भेटी व उद्योगातील तज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्याने.
  - मायक्रो प्रोजेक्ट व मेजर प्रोजेक्ट पूर्ण केल्यानतंर विद्यार्थी प्रात्यक्षिक कौशल्यामध्ये निपुण होतो.
  - अभ्यासक्रमातील अंतर्भूत असलेल्या वरील सर्व बाबींमुळे पदविका प्राप्त विद्यार्थी उद्योगधंद्यासाठी जास्त उपयोगी ठरतात.

### ८. पदविका अभ्यासक्रम पुर्ण केल्यानतंर पुढे काय करता येईल ?

- शासकीय व खाजगी संस्थामध्ये उद्योगधंद्यामध्ये कनिष्ट अभियंता, पर्यवेक्षक इ. पदावर कामे करता येईल.
- स्वतःचा व्यवसाय सुरू करता येईल.
- पदवी अभ्यासक्रमाच्या थेट द्वितीय वर्ष प्रवेश घेऊन पदवी अभ्यासक्रम पुर्ण करता येईल.
- Institute of Engineers या संस्थेचा AMIE हा पदवी अभियांत्रिकी समकक्ष अभ्यासक्रम पुर्ण करता येईल.

### ९. थेट द्वितीय वर्ष पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रीया कशी आहे ?

- थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी प्रवेश हे, प्रवेश नियंत्रण प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांचे मार्फत केंद्रीय प्रवेश पध्दतीने करण्यात येतात.
- इच्छुक विद्यार्थ्यांना www.mahacet.org या संकेत स्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावे लागतात.
- पदविका अभ्यासक्रमाच्या प्राप्त गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार प्रवेश दिले जातात.

### १०. अभियांत्रिकी पदविका उत्तीर्ण झाल्यानंतर थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम प्रवेशाकरीता सी.ई.टी (CET) परीक्षा आहे का ?

- अभियांत्रिकी पदविका उत्तीर्ण झल्यानंतर थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी प्रवेशाकरीता कोणतीही सी.ई.टी (CET) परीक्षा द्यावी लागत नाही.

---

**अस्वीकार** : जरी लेखक आणि प्रकाशक यांनी या माहिती पत्रकातील माहिती प्रसिध्द करतेवेळी योग्य असल्याचे सुनिश्चित करण्यासाठी सर्व प्रयत्न केले असले तरी लेखक आणि प्रकाशक कोणत्याही नुकसानी किंवा व्यत्ययासाठी जबाबदार नाहीत. चुका मुळे, त्रुटी मुळे किंवा निष्काळजीपणा, अपघात किंवा कोणत्याही इतर कारणामुळे काही परिणाम झाल्यास त्यास लेखक, प्रकाशक जबाबदार राहणार नाहीत. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर, लेखक यांनी मुद्रित आणि प्रकाशित केले. **पत्ता** : महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, ४ था मजला, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, खेरवाडी, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०० ०५१.